## विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com


### ५ ते २५ एप्रिलपर्यंत परीक्षा अन नंतर उन्हाळा सुट्ट्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने दिलेल्या वेळापत्रकानुसार राज्य मंडळाच्या सर्वच शाळांमधील इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा ८ ते २५ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. त्यांचा निकाल १ मे रोजी जाहीर होईल आणि पहिलीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश २ मेपासून सुरू होतील. चालू शैक्षणिक वर्षातील नियोजित उन्हाळा सुट्ट्या देखील द्याव्या लागणार आहेत. त्यामुळे २०२५-२६ चे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासूनच सुरू होईल, अशी माहिती शिक्षणाधिकाऱ्यांनी दिली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्य मंडळाचे शैक्षणिक वर्ष देखील १ एप्रिलपासून सुरू होणार आहे, पण त्यासाठी आणखी एक वर्ष वाट पहावी लागणार आहे. तत्पूर्वी, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात पहिली व दुसरीपर्यंतचा अभ्यासक्रम बदलणार आहे. शाळा १ एप्रिलपासून सुरू करण्यासाठी अगोदर विद्यार्थ्यांच्या उन्हाळा, दिवाळी सुट्ट्या निश्चित कराव्या लागतील.


सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २०५ वा | शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरात १० हजार घरगुती गॅस सिलिंडरचा काळा बाजार

## शासनाला दरमहा अंदाजे १५ कोटी रुपयांचा चुना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर आणि जिल्ह्यात रोज सरासरी ५७ हजार घरगुती गॅस सिलिंडर वितरित होतात. त्यापैकी किमान १० ते ११ हजार घरगुती गॅस सिलिंडर काळ्या बाजारात विकले जातात, असा अंदाज आहे. यामुळे एलपीजी पंपचालक-मालक चिंतेत सापडले आहेत.

त्यांनी पंप सुरू करूनही त्यांचा गॅस विकला जात नाही, अशी वस्तुस्थिती आहे. घरगुती गॅस हा व्यावसायिक गॅसपेक्षा प्रती किलो ३७ रुपयांनी स्वस्त आहे. यातून काळा बाजार करणारी टोळी महिन्याला १५ कोटी रुपये घशात घालत असण्याची शक्यता आहे. परिणामी, शासनाचे दरमहा किमान १५ कोटी रुपयांचे नुकसान होत आहे.

१९ किलो व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत १८०० रुपये तर १४ किलो घरगुती गॅस सिलिंडर ८१० रुपयाला मिळतो. त्यामुळे अनेक छोट्या-मोठ्या व्यावसायिक, रिक्षाचालकांना एलपीजी किंवा व्यावसायिक गॅस परवडत नाही. या पार्श्वभूमीवर ते घरगुती सिलिंडरचाच गैरवापर करतात, अशी स्थिती शहर-जिल्ह्यात पहायला मिळते. सोलापूर शहरात घरगुती एलपीजी सिलिंडरचा बेकायदेशीरपणे वापर होतोय, अशी तक्रार एलपीजी पंप मालक-चालकांनी देखील यापूर्वी केली आहे. सोलापूर शहरात ७ एलपीजी गॅस पंप आहेत, पण त्यांचा केवळ २० टक्केच गॅस विकला जातोय, असेही त्यांनी म्हटले आहे. शहरातील असंख्य वाहनांमध्ये अनधिकृतपणे घरगुती गॅस सिलिंडर भरला जातो, तशा कारवाया यापूर्वी झाल्या आहेत. सार्वजनिक रस्त्यांवरील खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानांवर घरगुती गॅस सिलिंडर दिसतात, तरी कारवाई होत नाही. दुसरीकडे त्यावर पोलिसांनी कारवाई करावी की पुरवठा विभागाने असाही अधिकाराचा वाद आहेच.

दरम्यान, गॅस कंपनीच्या निकषानुसार प्रत्येक गॅस एजन्सीच्या किमान ८० टक्के ग्राहकांनी ऑनलाईन बुकिंग करुन घरगुती गॅस सिलिंडर घेणे अपेक्षित आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना २० टक्के ऑफलाइन बुकिंगसाठी सूट देण्यात आली आहे. पण सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मिळून दरमहा ३८ टक्के घरगुती गॅस सिलिंडर ऑफलाइन पद्धतीने वितरित करण्यात येतात. आजकाल जवळ जवळ प्रत्येक कुटुंबाकडे मोबाइल फोन आहे. त्यामुळे १०० टक्के ऑनलाइन बुकिंग केल्यास पारदर्शकता येईल. निकषानुसार ८० टक्के ग्राहकांनी जरी ऑनलाइन बुकिंग केली तरी शासनाचे दरमहा जिल्ह्यात १५ कोटी रुपये वाचणार आहेत. सध्या असंख्य छोट्या-मोठ्या व्यावसायिकांकडे घरगुती गॅस सिलिंडर आढळतात. गॅस कपंन्यांचे अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी किंवा जिल्हा पुरवठा विभाग यांच्याकडून ठोस कारवाई होताना दिसली नाही.

## उदघाटनाला सहा महिने पूर्ण, तरीही विमानसेवा नाही! सोलापूरकरांची फसवणूक ?




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या होटगी रोड विमानतळाचा उद्घाटन सोहळा २९ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन माध्यमातून हा समारंभ संपन्न झाला. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री या सोहळ्याला साक्षी होते. मात्र, निवडणूक आचारसंहितेपूर्वी हा कार्यक्रम उरकण्यात आल्याने प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होईल की नाही, याविषयीचं मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं होतं. आज सहा महिने उलटले तरीही सोलापूरकरांना विमानसेवेचा लाभ मिळालेला नाही. केवळ उद्घाटनाचा दिखावा करून जनतेला गाजर दाखवण्यात आले आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. जर सर्वसामान्य प्रवाशांसाठी विमानसेवा सुरू होत नसेल, तर या विमानतळाला कुलूप का लावू नये? केवळ पुढारी आणि अधिकाऱ्यांसाठीच सुविधा का? असा रोखठोक सवाल शहरवासीयांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून अशा प्रकारची अपेक्षा नव्हती. सोलापूरच्या जनतेने आता या विषयावर ठोस उत्तर मागण्याची गरज आहे.

## निमाच्या वतीने देशव्यापी संवेदना 2.0 रक्तदान शिबिराचे आयोजन

### गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार नोंद




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निमा आणि निफा यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या शहीद दिनी रविवार दि. 23 मार्च रोजी देशभरात संवेदना 2.0 या नावे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय प्रवर्तक डॉ. विनायक टेंभुर्णीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देशभरातील निमाच्या सर्व शाखांकडून रक्त संकलनाचे कार्य करण्यात येणार आहे. यापूर्वी नेमाने 99 हजार 644 इतके रक्त संकलन केले होते. निमा ही सर्वात मोठी वैद्यकीय संघटना असून चार लाखाहून अधिक डॉक्टर सदस्य आहेत. निमा सोलापूर शाखेकडून रविवार दि. 23 मार्च रोजी बाराहून अधिक ठिकाणी रक्त संकलन केंद्रे उपलब्ध करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील विविध हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात येत आहेत. सोलापूर परिसरातून एक हजाराहून अधिक बॉटल रक्त संकलन करण्याचा प्रयत्न आहे, असे निमा सोलापूर शाखा अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी, मुख्य समन्वयक डॉ. नितीन बलदवा यांनी सांगितले.

नागरिकांनी या शिबिरात रक्तदान करून राष्ट्र कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. नागनाथ जिड्डीमनी यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेचे डॉ. नितीन बलदवा, डॉ. रवी गायकवाड, डॉ. अभिजीत पुजारी, डॉ. प्रवीण ननवरे, डॉ. रमाकांत अयाचित आदी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात महिला, दिव्यांग आणि कृषीसाठी विशेष तरतूद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेत असलेल्या प्रशासकीय राजवटीतील तिसऱ्या म्हणजेच २०२५-२६ वषार्चे ४५ कोटी तीन लाख ९० हजार रुपयांचे अंदाजपत्रक सादर झाले. या अंदाजपत्रकास बुधवारी (ता. १९) विशेष सभेत प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मान्यता दिली.

मागील योजना कायम ठेवतानाच यंदा महिला शेतकरी गटांना ड्रोन फवारणी यंत्र, शेतकऱ्यांना मधुमक्षिकापेटी, आरोग्य केंद्रांत ई ओपीडी, गर्भवतींना दवाखान्यात नेण्यासाठी आशांना खर्च, जनईत्री कार्ड, रुग्णांना युनिव्हर्सल डिस्चार्ज कार्ड देणे, शाळांत सौरऊर्जा संयंत्र बसविणे अशा काही नवीन योजना प्रस्तावित केल्या केल्या आहेत.

गतवर्षाच्या तुलनेत यंदाच्या अंदाजपत्रकात ३ कोटींची घट झाली असली तर ७ लाख ७३ हजारांचा शिलकी अंदाजपत्रक सादर केला आहे. निधी उपलब्धतेबाबत व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंट ॲडमिनिस्ट्रेटर (व्हीपीडीएए) प्रणाली सुरू झाल्यानंतर व्याजाच्या उत्पन्नात घट अपेक्षित आहे.

त्यामुळे यंदा अंदाजपत्रक तयार करताना लेखा व वित्त विभागाने व्याजातून सुमारे १० कोटी कमी व गतवर्षाइतकेच म्हणजे १८ कोटी ५१ लाखांचे उत्पन्न गृहीत धरले आहे. व्याजातून १८ कोटी ५१ लाख, उपकरातून १० कोटी, पाणीपट्टीतून १ कोटी २५ लाख, बांधकामकडील १ कोटी ४२ लाखांचे उत्पन्न गृहीत धरून व आरंभीचे शिल्लक ८ कोटी १४ लाखांचे समावेश करून अंदाजपत्रक बनविले आहे. प्रशासक जंगम यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात नावीन्यपूर्ण योजनांवर भर देण्यात आला आहे. आरोग्य व कृषी विभागाच्या तरतुदीत गतवर्षाच्या तुलनेत वाढ केली आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, प्रसाद मिरकले, ग्रामीण विकास यंत्रणेचेच प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या २०२४ - २५ च्या सुधारित व २०२५-२६ च्या मूळ अंदाजपत्रकास बुधवारी (ता. १९) विशेष सभेत मान्यता देण्यात आली. गतवर्षाच्या तुलनेत यंदाच्या अंदाजपत्रकात आरोग्य विभागासाठी १ कोटी १२ लाख ७७ हजार, ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी पाच लाख, कृषी विभागासाठी १४ लाखांची अधिक तरतूद केली आहे.

मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी सकाळी १०.३० वाजता हे अंदाजपत्रक प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे सादर केले. त्यांनी ते सभागृहात मांडले. गतवर्षीचे मूळ अंदाजपत्रक ४८ कोटी ११ लाख ६७ हजारांचे तर सुधारित अंदाजपत्रक ५६ कोटी ९४ लाख २५ हजारांचे होते.

### महिलांसाठी शक्तीपंख, ड्रोनला ५० लाख

कृषी विभागासाठी गतवर्षाच्या मूळ तरतुदीपेक्षा १४ लाखांची अधिक वाढ केली आहे. एकूण ३ कोटी ८६ लाखांची तरतूद केली आहे. महिला शेतकरी गटांना फवारणी ड्रोन पुरवण्यासाठी ५० लाखांची तरतूद असून जिल्ह्यातील ११ गटांना ४ लाखांपर्यंतचे अनुदान मिळणार आहे. शेतकऱ्यांना मधुमक्षिका पेटी मिळणार असून कडबाकुट्टी, ताडपत्री, स्लरी फिल्टरसाठी ९५ लाख, अभियांत्रिकी योजनेसाठी ९५ लाख, सिंचनासाठी पंप, तुषार सिंचनासाठी ७५ लाखांची तरतूद केली आहे.

### दिव्यांगांना ई बाईक, शाळांना सौरऊर्जा संयंत्र

समाजकल्याण विभागासाठी ४ कोटी ६१ लाख २८ हजारांची तरतूद केली आहे. दिव्यांगांना ई रिक्षा व ई बाईकसाठी १ कोटी ३० लाख, अतितीव्र दिव्यांगांच्या पालकांना मदतीसाठी १० लाखांची तरतूद केली आहे. नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत दिव्यांग शाळांना सौरऊर्जा संयंत्रासाठी २५ लाखांची तरतूद केली आहे.

### उत्पन्नवाढीसाठी गाळे बांधणार

जिल्हा परिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी गाळे बांधण्यासाठी २७ लाख तर विश्रामगृह दुरुस्ती, विस्तारासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. गाळे बांधकामासाठी जागेची अडचण दूर झाली आहे. तसेच चार - पाच विश्रामगृह सुसज्ज बनविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## राज्यातील पोलीस दलात दहा हजार पदे भरण्यात येणार




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. पुणे, मुंबईसह राज्यातील विविध भागांमध्ये वाढती गुन्हेगारी आणि पोलिस दलातील तुटवडा हा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विषयावर चर्चा झाली असता, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 10,500 रिक्त जागांसाठी लवकरच पोलीस भरती होणार असल्याची मोठी घोषणा केली.

राज्यात लोकसंख्या वाढत असताना पोलीस दलातील कर्मचारी संख्येची कमतरता जाणवत आहे. यामुळे पोलिसांवर अतिरिक्त ताण येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले की, राज्यात सध्या 10,500 पोलीस पदे रिक्त आहेत. तसेच दरवर्षी 7 ते 8 हजार पोलीस सेवानिवृत्त होतात. मागील तीन वर्षांत विक्रमी 35,802 पदांची भरती करण्यात आली आहे. आता उर्वरित रिक्त जागांसाठीही लवकरच प्रक्रिया राबवली जाणार आहे. विशेषतः पोलीस उपनिरीक्षक पदाच्या रिक्त जागा भरण्यात आल्या असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी पोलीस दलाच्या बळकटीसोबतच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात सीसीटीव्ही यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (अक) वापर केला जाणार आहे. वाहतूक व्यवस्थापन आणि गुन्हेगारी नियंत्रणासाठी गुगल कंपनीसोबत 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन एआय' करार करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूरमधील घटनेचा संदर्भ देत स्पष्ट केले की, पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली जाईल. महाराष्ट्रातील शांतता कोणीही भंग करू नये, आणि जर कोणी तसा प्रयत्न केला, तर त्याला कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

2025-26 च्या अर्थसंकल्पात गृह विभागासाठी 36,614 कोटी 68 लाख 9 हजार रुपये इतकी मोठी तरतूद करण्यात आली आहे. या निधीचा उपयोग पोलीस भरती, यंत्रणा सुधारणा, तांत्रिक सुविधा आणि सुरक्षेसाठी करण्यात येणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकार गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर कारवाई करत आहे. 2023 च्या तुलनेत 2024 मध्ये गुन्ह्यांमध्ये 2,586 प्रकरणांनी घट झाली आहे. तसेच देशातील पहिल्या पाच गुन्हेगारी शहरांच्या यादीत महाराष्ट्रातील कोणतेही शहर नाही. त्यामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था तुलनेने अधिक चांगली असल्याचा दावा त्यांनी केला.

## राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वषार्पासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-2026 या वषार्पासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे.

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून 1 एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले.


## पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य | सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षांपर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फॉन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# अस्तित्व चिमणीचे

20 मार्च रोजी जागतिक चिमणी दिन आहे. 'चिमणी वाचवूया', असा संदेश या दिनी दिला जातो. या इटुकल्या पिटुकल्या जीवाचे निसगार्तील अस्तित्व कायम राहायला पाहिजे. त्यानिमित्तानेङ्ग लहानपणी घराजवळ एक पिंपरणीचे झाड होते. सकाळ झाली की उजाडल्याचे संकेत त्या झाडावरच्या किलबिलाटाने यायचे आणि दिनक्रम सुरू व्हायचाङ्ग त्यावेळी गावांत जुने वाडे, पांढया मातीची घरे होती. मागे परस दारी लिंबाची, पेरूची, शेवग्याची आणि असंख्य फुलाची झाडी होती, गुरांचा गोठा होता. त्यामुळे दिवसभरात अंगणात, भिंतीवर आणि आजूबाजूला चिमण्याचा खूप चिवचिवाट असे. पूर्वी प्रत्येक घराच्या सोप्यात, देवळाच्या हॉलमध्ये निरनिराळे फोटो, तसबिरी अडकविलेल्या असायच्या त्याच्या पाठीमागे चिमण्या घरटे करायच्या, त्यात पिल्ली वाढवायच्या एकाद्या घरात चिमण्या येऊ लागल्या तर शुभ संकेत मानले जायचे.

चिमणी हा माणसाजवळ राहणारा पक्षी असल्यामुळे घरात स्थिरावत असे, तसेच घरातील माणसेही त्यांना खाऊ पिऊ घालून त्यांचे लाड करीत. अशा घरभर फिरर्णाया चिमण्या लहान मुलांच्यासाठी आकर्षण असत. आमची आजी दुपारच्या वेळात चिमण्यासाठी तांदळाच्या, मक्याच्या कण्या, ज्वारी, बाजरी टाकत असे, बाजूला पाण्याचा घमेली असे, झाडाखाली कुत्र्यासाठी पाण्याचा वाडगा असे. त्यामुळे तिथे पाणी पिण्यासाठी चिमण्यांची झुंबड उडे. आषाढ-श्रावण म्हणजे पावसाचे दिवस त्यामुळे शेतात खायला काही नसे मग चिमण्याची शाळा सरळ सोप्यातच भरे.चिमण्याचे थवेच्या थवे अंगणात जमत त्यांना दाणे टिपताना बघण्यात एक वेगळीच मजा असे.

आजकाल खेड्यातसुद्धा स्लॅबच्या इमारती झाल्यात लोकसंख्या वाढलीय, झाडे कमी झालीत, नदी नाल्याचे पाणी पिण्यालायक राहिलेले नाही, हवा प्रदूषित झालीय, रासायनिक खते, किटकनाशकांचा बेसुमार वापर, अंगण संस्कृती नाहीशी होऊन सगळीकडे डांबरीकरण झाले, इतरही अनेक कारणांमुळे चिमण्यांना त्यांचे अस्तित्व टिकविणे अवघड झाले आहे. पक्षीतज्ज्ञांच्या मते, मोबाइल टॉवरमधून बाहेर पडर्णाया विद्युत चुंबकीय लहरी, तापमानवाढ, प्रदूषण इत्यादी गोष्टींचा तसेच झाडांची संख्या कमी झाल्याने व सिमेंटची घरे वाढल्याने चिमणीस घरटे बांधणे अवघड झाले आहे. या सर्व गोष्टींमुळे चिमण्यांचा वाढीचा वेग मंदावला आहे. किंबहुना ज्या वेगाने तो वाढायला हवा होता तसा तो वाढत नाही. तरी ही चिमणी अजून तग धरून आहे. चीनमध्ये 1960च्या दरम्यान तिथल्या शेतर्कयांनी चिमण्या, बेडूक, उंदीर यांचा मोठ्या प्रमाणावर संहार केला होता. त्यामागे हे पशुपक्षी पिकाचं नुकसान करताहेत असा समज होता पण कालांतराने हा समज चुकीचा होता हे निदर्शनाला आले आणि त्यांच्या शेतात चिमण्या नसल्याने मोठ्या प्रमाणावर तिथं कीटके, अळया वाढल्या आणि संपूर्ण पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. चिमण्या लुप्त होण्यामुळे पर्यावरणापुढे अनेक धोके उभे राहिले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरातील तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव झाली. कीटकभक्ष्यी असलेल्या चिमण्यासारख्या पक्ष्यांची संख्या कमी होणे, हे मानवासाठी धोकादायक असल्याचे अभ्यासकांचे मत निर्माण झाले आणि यातूनच 2010 पासून 20 मार्च हा दिवस 'जागतिक चिमणी दिवस' म्हणून साजरा केला जाऊ लागला.

आज जरी शहरी भागात चिमण्यांचा चिवचिवाट कमी झाला असला तरी ग्रामीण भागात अद्याप चिमण्यांचे अस्तित्व टिकून आहे. चिमण्यांच्या घरावर अतिक्रमण झाले असले तरी मानवी वस्तीच्या आसपास राहण्याच्या सवयीमुळे चिमण्या आजही आपल्याला पाहायला मिळतात. म्हणून चिमणी वाचविण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या घराजवळ, गच्चीवर, अंगणात धान्य, पाणी ठेवणे, खोपे करणे अशा साध्या साध्या गोष्टी केल्या तरी सुद्धा चिमण्यांची संख्या नक्की वाढेल आणि पुन्हा सर्वत्र चिवचिवाट ऐकू येईल.

चिऊताईचा चिवचिवाट सध्या जरी कालबाह्य होताना दिसून येत असला तरी सुद्धा चिमण्यांचे संरक्षण आणि संवर्धन होऊन त्यांच्या संख्येत वाढ व्हावी यासाठी वन्यजीव संरक्षण संघटना तसेच पक्षीमित्र व प्राणी मित्रांचे जे कार्य चालू आहे ते निश्चितच कौतुकास्पद आहे. आपण सर्वजण जर या उपक्रमात सहभागी झालो आणि आपले कार्य म्हणून लक्ष घातले तर नक्कीच फरक पडेल आणि चिवचिवाट वाढेल, याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

## प्रबोधन

# अंधश्रध्देचा रोग !

अंधश्रद्धा पसरवणे, जोपासणे, वाढवणे हा काही लोकांचा फायदेशीर धंदा आहे. तसाच तो अंधश्रद्धा निर्मूलकांचाही धंदा आहे, असं म्हटल्यास तुम्हालाही धक्का बसेल. परंतु त्याने वास्तव बदलणार नाही. अंधश्रद्धा ही सोन्याचं अंड देणारी कोंबडी आहे. ती कापून खाणं, हे शहाणपणाचं नाही, हे अंधश्रद्धा प्रसारकांपेक्षा अंधश्रद्धा निर्मूलकांना अधिक चांगलं कळत असावं. मला भेटलेल्या एका अंधश्रद्धा निर्मूलकाला म्हटलं, 'तुम्ही अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या देव-धमार्बाबत काहीच बोलत नाही. मग अंधश्रद्धेचं निर्मूलन कसं होणार?' तो भडकला. म्हणाला, 'आम्ही काही नास्तिक, पाखंडी, चार्वाकपंथी नाहीत.' त्यावर त्याला महात्मा गांधीजींची एक गोष्ट सांगितली. बिहारच्या चंपारण्य जिल्ह्यात गांधीजी गेले होते. एका गावातील गावकरी देवीमाँला बोकडाचा बळी देण्यासाठी वाजतगाजत चाललेलं त्यांनी पाहिलं. बळी देण्याची तयारी झाल्यावर गांधीजी अचानक पुढे झाले. गावकऱ्यांना त्यांनी विचारलं, 'हा बळी कशासाठी देता?' लोक म्हणाले, 'देवीमाँला संतुष्ट करण्यासाठी!' गांधीजी म्हणाले, ह्यमग असं करा, तुमच्या देवीमाँपुढे माझा बळी द्या! बोकडापेक्षा माणूस मी खूपच श्रेष्ठ आहे. तुमची ही देवी माझा बळी दिल्याने खूप संतुष्ट होईल. तुमचा खूप खूप फायदा होईल!' लोक ग्रामीण होते, पण गांधीजींचं बोलणं विचारात घेऊन बोकडास सोडून दिलं. आत्मबलिदान करण्याच्या पातळीवर जा, अंधश्रद्धा निर्मूलन एका क्षणात होईल, असा या प्रसंगाचा अर्थ आहे. वरील कार्यकत्यार्ला मी विचारलं, 'तू गांधीजींना नास्तिक, पाखंडी म्हणशील का?' तो शांत राहिला.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अंधश्रद्धा ही एक विकृती आहे, तर श्रद्धा हीसुद्धा विकृतीच आहे. श्रद्धेतूनच अंधश्रद्धा जन्मतात. बुद्धिहीन, निर्बुद्ध माणसातच श्रद्धा मूळ धरते. बुद्धिवादी माणूस श्रद्धेचा किंवा अंधश्रद्धेचा बळी होत नाही. याचा अर्थ, सारे भक्त हे अंधश्रद्धाळू असतातच. मग ते एकेश्वरवादी असोत की बहुदेववादी असोत! फक्त निरीश्वरवादी माणूसच श्रद्धा- अंधश्रद्धेचं मायाजाल तोडून मुक्त जीवन जगतो. बुद्धिवादी माणूस चिकित्सक असतो, तर श्रद्धाळू- अंधश्रद्धाळू चिकित्सक नसतो. बुध्दिं शरणं गच्छामि या लेखात बुद्धिनिष्ठ समाजवादी ना. ग. गोरे लिहितात, 'व्यक्तीचे व समष्टीचे नियंत्रण करणारा कोणी ईश्वर आहे हा सिद्धान्त जेव्हा बुद्धिवादी नाकारतात, तेव्हा बुद्धिवादी समाजाने स्वयंशासित असलं पाहिजे, असं ते मानत असतात. म्हणूनच त्यांचा विश्वचालक परमेश्वराला जसा विरोध असतो, तसाच समाजचालक हुकूमशहालाही विरोध असतो. बुद्धिवादी हा तत्त्वतः लोकसत्तावादी, समतावादी आणि विषमताविरोधी असतो.'

सगळे प्रेषित, त्यांनी स्थापलेल्या धर्माचे धर्माधिकारी, मठाधीश, अनुयायी सारे श्रद्धा- अंधश्रद्धा यांनी झपाटलेले असतात, उन्मादी असतात, भावनेच्या आहारी गेलेले म्हणूनच बुद्धिवादाला मुकलेले असतात. जगाचे भले, अशा या लोकांकडून होणे शक्यच नसतं. ना. ग. गोरे त्याविषयीम्हणतात, 'समता, मैत्र, बंधुभाव, परहित ही सर्व सामाजिक मूल्यं आहेत. ती ईश्वर न मानताही आचरता येतात. विज्ञानाच्या विकासामुळे तर ती आज अत्यावश्यक बनली आहेत. '

समाजसेवक गाडगेबाबांची एक आठवण फारच उद्बोधक आहे. एकदा पंढरपुरातील त्यांच्या धर्मशाळेपुढील गटारं तुंबल्याने गटाराचं पाणी धर्मशाळेत घुसलं. बाबांनी हे पाहातच सरळ गटारात उतरून ते सफाईच्या कामाला५लागले. त्याचवेळी तेथून तुकडोजी महाराज चालले होते. बाबांना गटारात उभं राहून घाण उपसताना त्यांनी पाहिलं. बाबांनी विचारलं, 'कुठं चाललात?' ते म्हणाले, 'विठ्ठलदर्शनाला!' बाबा हसले, म्हणाले, 'ठीक जा!' पुन्हा कामाला भिडले. पण तुकडोजी विठ्ठलदर्शनाला गेले नाहीत. ते बाबांना म्हणाले, 'माझा विठ्ठल इथे गटार उपसतोय. मीही तेच करणार!'

अंधश्रद्धा पसरवणाऱ्यांना वरील गोष्टींचं मर्म कळलं तरी वळणार नाही. पण अंधश्रद्धा निर्मूलकांना गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज नास्तिक, पाखंडी वाटले नाहीत तरी पुष्कळ झालं! कारण त्यांच्या बुद्धिनिष्ठ कार्यविचाराचं सार सांगतं-

श्रद्धा-अंधश्रद्धा । दोन्हीही एकच
त्यांना दूरूनच । हात जोडा ॥१
श्रद्धा मातेपोटी । जन्मे अंधश्रद्धा
करीतसे वांधा। बुद्धीचा ॥२
श्रद्धा जीवी व्यक्ती । असे भयंकर
चांगुणा जी ठार । करी पोरा ॥ ३
बुद्धिजीवी तोच । जगाचा तारक
सद्गुणांचा अर्क । त्याजपाशी ॥४
बुद्धी करी हिता । जनाचे - मनाचे ।
तिच्या संगतीचे। फळ गोड ॥५
श्रद्धेला जो बळी पडतो तो मूर्ख
अंधश्रद्धा दुःख । त्यास देते ॥६
श्रद्धेच्या गाढवा । समजूनी खोडा
स्वारी करी वेडा । भाविक तो ॥७
लाथाडा गाढवा । हाकुनी द्या दूर
बुद्धीवर स्वार । होऊनिया ॥८
बुद्धीनेच अंती । होईल आनंद
आनंदाचा कंद । बुद्धी हीच ॥९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# निरीश्वरवादाचे महत्त्व

ईश्वर तुमचं भलं करो, हे वाक्य वापरून वापरून गुळगुळीत झालंय. पण ईश्वराचं अस्तित्व नष्ट होण्याची चिन्हं मात्र दिसत नाहीत. दोन पैशांची भीक मिळाल्यावर फाटक्या लुंगीतील फकीरसुद्धा सहज म्हणतो, 'अल्ला तेरा भला करेगा!' परंतु त्यानेच तर आपल्याला भीकेला लावलं आहे, मग तो इतरांचं भलं कसं करणार, अशी शंकाही त्या बिचाऱ्याला येत नसते. देव तुमचं भलं करो या वाक्यातून मी तुमचं भलं करू शकतच नाही, अशी दुबळी कबुलीही असते. आपल्या मयार्दा जाणणं हे काही वाईट नाही. पण ईश्वरच भलं करतो, असं म्हणणं हे जे कुणी दुसऱ्याचं भलं करण्यासाठी धडपडतात त्यांचा धडधडीत अपमान नव्हे काय? सामान्य माणसांनी आपल्या मयार्देत इतरांचं काही कल्याण केलं, तर त्याचं श्रेय ज्याने ज्यांचं भलं झालं त्याला का देऊ नये? ईश्वर भलं करो हे वाक्य ईश्वराशिवाय इतरांचं परोपकारी सामर्थ्य मान्यच करायचं नाही, अशा धोरणाने वापरलं जातं. भीक मिळाल्यावर भूक नाही, अशा धोरणाने वापरलं जातं. अशात स्वामी विवेकानंदांसारख्या बुद्धिमान व्यक्तीने येशू ख्रिस्ताच्या वचनाचा हवाला देऊन ईश्वराठायीच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्‌ अशी शक्ती असल्याचा डांगोरा पिटावा म्हणजे प्रश्नच मिटला! विवेकानंद म्हणतात, ह्ययेशू ख्रिस्ताच्या पुढील शब्दांची आठवण ठेवा, मागा आणि ते तुम्हाला मिळेल! शोधा म्हणजे तुम्हाला सापडेल! ठोठवा म्हणजे तुमच्यासाठी दरवाजा उघडेल! हे शब्द अक्षरशः खरे आहेत. ही अलंकारिक भाषा नव्हे. ईश्वराच्या एका श्रेष्ठ अवताराच्या हृदयाचे ते बोल आहेत. ज्याने ईश्वराचा अनुभव घेतला होता, जो ईश्वराबरोबर बोलला व राहिला होता, तुम्ही किंवा मी ज्याप्रमाणे ही इमारत प्रत्यक्ष पाहातो त्यापेक्षाही कितीतरी पटीने अधिक प्रत्यक्ष असा ज्याचा ईश्वरी अनुभव होता, त्याचे हे शब्द आहेत.'

खरं पाहता येशूचे उद्गार ऐहिक किंवा इहवादी वळणाचे आहेत. शोधा म्हणजे सापडेल, मागा म्हणजे मिळेल, ठोठवा म्हणजे दरवाजा उघडेल ही भाषा या जगाशीच संबंधित आहे. पण विवेकानंदांनी तिला पारलौकिक, आध्यात्मिक रूप देण्याचा खटाटोप तर केलाच; शिवाय निराधार ईश्वर कल्पनेला आधार देऊन भक्कम करण्याचाही प्रयत्न केला. बुद्धिमान माणसंही रूढ कल्पनेचे बळी कशी होतात, याचं हे उत्तम उदाहरण आहे. श्रद्धाळूचं वर्णन पाश्चात्त्य विचारवंत विल्यमसन यांनी मार्मिकपणे केलंय. ते लिहितात, 'हमाल जसा प्रवाशांचं सामान उचलून नेतो, त्याप्रमाणे श्रद्धाळू माणसं आपल्या बुद्धीचं बोचकं दुसऱ्यांच्या डोक्यावर देतात.' सांख्यदर्शनकार कपिल मुनी, निरीश्वरवादी बृहस्पती आणि महात्मा चार्वाक यांनी हे नसलेल्या ईश्वराचं ओझं दूर फेकून दिलं होतं. पण त्यांच्या मतांचा प्रचार-प्रसार कुणी करीत नाही, हे मानववादाचं खरं दुखणं आहे. उलटपक्षी ईश्वरवाद्यांची संख्याही मोठी आहे आणि त्यांच्या प्रचाराचा धडाकाही मोठा आहे. म्हणून ईश्वर तुमचं भलं करो, अशी भाषा जनसामान्यांच्या तोंडी पक्केपणी बसली आहे. या दुखण्यावर एकच इलाज आहे. तो म्हणजे, बुद्धिवाद्यांनी कंबर कसून लोकांना ईश्वर ही खोटी कल्पना आहे, हे आहे त्या शक्तिनिशी ओरडून सांगत राहिलं पाहिजे.

इतिहासाच्या वाचनाने, चिंतनाने ईश्वराला निकालात काढता येतं. सोरटी सोमनाथ म्हणेजागृत देवस्थान! पण गजनीच्या महंमदाने त्याच्या गाभाऱ्यात पाच हजार भक्तांची निर्घृण कत्तल केली. काय केलं सोमनाथाने ? नंतर त्या क्रूरकम्यार्ने सोमनाथाची मूर्ती हातोड्याचे घाव घालून फोडली. कुठे गेलं ते माहात्म्य? ते महंमदाच्या पोत्यातून गजनीला गेलं. भगवान श्रीकृष्णाचं माहात्म्य गायिलं जातं. पण आपल्या कुळाचा नाश पाहाण्याचा दुर्धर प्रसंग या ईश्वरावर ओढवला. विश्वचालक, जगन्नियंता, जगदात्मा, सर्वसाक्षी, कर्ता-करविता अशा बड्या विशेषणांनी भक्त ज्याला सतत आळवत असतात, त्यांचे हे हाल! मग त्यांना आपण ईश्वर म्हणावं काय? जग निर्माणकर्ता ब्रह्मदेव. इंद्राच्या उच्छृंखल वृत्तीपेक्षा ब्रह्मदेवाचं वर्तन अक्षरशः स्खलनशील. अप्सरेला पाहिल्याबरोबर वीर्यस्खलन व्हायचं, असं त्याची कथा सांगते. याच्यापेक्षा सामान्य सत्छील माणूस कितीतरी श्रेष्ठ असतो. आणि हा म्हणे सृष्टी कर्ता. असे हे ईश्वर !यांच्याकडून आपलं भलं (की चांगभलं?) व्हावं असं कोणाला वाटेल? या ईश्वरांना आणि त्यांच्याकडून आमचं भलं करू पाहाणाऱ्यांना कोपरापासून नमस्कार आणि विनंती-

कृपा करूनिया । 'देव भले करो'
असे कोणालाही । म्हणू नका ॥ १
तुम्ही केले तर । पाच टक्के तरी
होईल कल्याण` मला वाटे ॥२
देव नाही मग । एक टक्का तरी
होईल कल्याण` कसे सांगा? ॥ ३
देवाच्या ऐवजी । उभे रहा तुम्ही
हिताचा प्रयत्न । करा थोडा ॥४
नाही तरी दोष । तुम्हा मी देईन
शुभेच्छा म्हणेन । कोरडी ही ॥५
भार स्वतःवर । आलेला टाकला
देवावर असे । म्हणेन मी ॥ ६
झटकून हात। झाला मोकळेच
बरे नव्हे कृत्य । तुमचे हे ॥७
'देव भले करो'। शब्द हे आवरा
स्वशक्ती करा` जागृत की ॥८
करणार भले` तर तुम्हीच करा
पोकळ तो वारा। शब्दांचा ना ।।



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून शेतकऱ्यांची आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधांची निर्मिती करणे आहे. यामुळे शेतकऱ्यांना योग्य पाण्याची सुविधा मिळेल आणि त्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होईल व ते आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील.



**अनुदानाची माहितीः**

योजना अंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या अनुदानांची सुविधा उपलब्ध आहेः

- नवीन विहीरः 2 लाख 50 हजार
- जुनी विहीर दुरुस्तीः 50 हजार
- इनवेल बोअरिंगः 20 हजार
- पंप संचः 20 हजार (10 अश्वशक्ती क्षमतेच्या विद्युत पंप संचासाठी 100% अनुदान)
- वीज जोडणी आकारः 10 हजार
- शेत तळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरणः 1 लाख
- सूक्ष्म सिंचन संचः
- ठिबक सिंचन संचः 50 हजार
- तुषार सिंचन संचः 25 हजार

**पॅकेजेस**

योजना अंतर्गत विविध पॅकेजेस उपलब्ध आहेतः

**नवीन विहीर पॅकेज :** या पॅकेजमध्ये नवीन विहीर, पंप संच, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, आणि आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग यांचा समावेश आहे.

**जुनी विहीर दुरुस्ती पॅकेजः** यामध्ये जुनी विहीर दुरुस्ती, पंप संच, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, आणि आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग यांचा समावेश आहे.

**शेत तळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण :** या पॅकेज अंतर्गत शेत तळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यात येते.

**अर्ज प्रक्रिया**

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरावा लागतो. अर्ज भरण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहेः

1. वेबसाईटः [www.mahadbt.maharashtra.gov.in](http://www.mahadbt.maharashtra.gov.in)
2. ऑनलाइन अर्ज भरण्यावर लाभार्थीची निवड लॉटरी पद्धतीने होते.
3. सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.
4. जिल्हास्तरीय समितीकडून मंजूरी मिळाल्यानंतर लाभार्थ्यांना अनुदान मिळेल.

**पात्रतेच्या अटी**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना काही अटी पूर्ण कराव्या लागतातः

1. लाभार्थी अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकरी असावा.
2. जात प्रमाणपत्र असावे.
3. नवीन विहीरचा लाभ घेण्यासाठी किमान 0.40 हे शेतजमीन असणे आवश्यक आहे.
4. सामुहिक शेतजमीन किमान 0.40 हे धारण करणारे एकत्रित कुटुंब लाभ घेऊ शकते.
5. इतर घटकांसाठी किमान 0.20 हे शेतजमीन असणे आवश्यक आहे.
6. कमाल शेतजमीन 6.00 हे आहे.
7. 7/12 दाखला आणि 8 अ उतारा आवश्यक आहे.
8. आधार कार्ड असणे आवश्यक आहे.
9. बँक खाते आधार काडाशी संलग्न असावे.
10. स्व. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य.
11. वार्षिक उत्पन्न 1 लाख 50 हजार पेक्षा कमी असावे.
12. उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून मिळवावा लागेल.
13. ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करावी लागतातः

1. 7/12 दाखला आणि 8 अ उतारा
2. 6 ड उतारा (फेरफार)
3. जात प्रमाणपत्र
4. तहसीलदारांकडील उत्पन्नाचा दाखला
5. आधार कार्डाची छायांकित प्रत
6. बँक पासबुकाची छायांकित प्रत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची संधी आहे, ज्यामुळे त्यांच्या शेतीतील उत्पन्न वाढण्यास मदत होईल. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आवश्यक साधन-संपत्ती उपलब्ध करून देण्यात येते, ज्यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित पद्धतीने अर्ज करावेत. प्रशासनाच्या या योजनेतून आपल्या शेतीला कायमस्वरूपी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करावेत.

**सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी
सोलापूर

# राज्यात यंदाच्या वर्षी ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात यंदाच्या वर्षी १८ मार्च २०२५ रोजीपर्यंत सीसीआय म्हणजेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी पूर्ण झाल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य अभिजीत वंजारी यांनी अल्पकालीन चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री रावल बोलत होते. यावेळी सदस्य सदाभाऊ खोत, अमोल मिटकरी, परिणय फुके, अरुण लाड यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून राज्यात कापूस खरेदी केंद्र उघडण्यात येतात आणि त्यांच्याकडूनच कापसाची खरेदी केली जाते असे सांगून मंत्री रावल म्हणाले की, यंदा कापसाला लांब धाग्यासाठी ७ हजार ५२१ रुपये तर मध्यम धाग्यासाठी ७ हजार १२१ रुपये हमीभाव देण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी राज्यात १२४ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. कापूस खरेदीनंतर त्याच्या जिनींग आणि प्रेसिंगची प्रक्रिया केली जाते. त्यासाठी सप्टेंबर ते सप्टेंबर असा करार प्रेसिंगवाल्यांसोबत केलेले असतात. त्यामुळे कापूस खरेदी बंद नसल्याचे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

# विठ्ठलवाडीचे माजी सरपंच रामचंद्र जाधव यांचे निधन

**माढा (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलवाडीचे माजी सरपंच रामचंद्र नाना जाधव यांचे अल्पशा आजाराने बुधवारी रात्री साडेसात वाजता निधन झाले.ते ८६ वषार्चे होते.त्यांनी विठ्ठलवाडीचे जवळपास ३० वर्ष सरपंच म्हणून काम पाहिले.ते विठ्ठलवाडीचे उपसरपंच हनुमंत (अण्णा) जाधव यांचे वडील होते.त्यांचे गावाच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात खूप मोठे योगदान होते.घरोघरी निर्धुर चूल या विशेष उपक्रमाबद्दल त्यांचा दिल्ली येथे तत्कालीन माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते येथे विशेष सत्कार करण्यात आला होता.त्यांच्या पश्चात विठ्ठलवाडीचे उपसरपंच हनुमंत (अण्णा) जाधव,तीन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे. शोक व्यक्त करताना सुरेश शेंडगे म्हणाले



की आप्पा यांनी कोणतीही काम करताना पदरमोड करत गावाच्या विकासास हातभार लावला होता.त्यांच्या आकस्मित निधनामुळे विठ्ठलवाडी व परिसरात शोककळा पसरली.याप्रसंगी नातेवाईक,मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# राजश्री शाहू प्रतिष्ठान शिरूरच्या सल्लागारपदी प्रा. डॉ.जयपाल पाटील यांची नियुक्ती

**अलिबाग (कटूसत्य वृत्त):-** पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या राजश्री शाहू प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी अलिबागचे आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, प्रगतिशील शेतकरी, आणि समाजसेवक प्रा. डॉ. जयपाल पाटील यांची दिनांक 7 मार्च रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या कार्यकारणी मध्ये नियुक्ती केल्याचे पत्र दिले आहे.



यामध्ये ते म्हणतात सामाजिक न्याय शिक्षण शाश्वत विकास आणि ग्रामीण उन्नती या क्षेत्रात राजश्री शाहू महाराजांच्या विचारानुसार कार्य करणाऱ्या राजश्री शाहू प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेची स्थापना सन 2014 मध्ये करण्यात आली मागील 10 वर्षापासून संस्था शिक्षण पर्यावरण संवर्धन कृषी आदिवासी विकास आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहे.

आपण आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, प्रगतिशील शेतकरी आणि समाजसेवक म्हणून समाजासाठी अतुलनीय कार्य केले आहात, विशेषतः सेंद्रिय शेतीच्या प्रसारासाठी, आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रभावी उपाययोजनांसाठी, आणि आदिवासी व वंचित समाजाच्या विकासासाठी आपले कार्य उल्लेखनीय आहे.

आपल्या कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेत गुणवंत कामगार, उत्कृष्ट पत्रकार, आदिवासी सेवक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव केला आहे. आपली पद्मश्री 2024 साठी माननीय पंतप्रधान कार्यालय निवडी पर्यंत प्रगती झाली होती हेही आम्हाला अभिमानास्पद आहे, महाराष्ट्र पोलिसांनी चुकीच्या पाठवलेल्या अहवालामुळे निवड होऊ शकली नाही याचे दुःख आहे. तुमच्या मौल्यवान ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ संस्थेसाठी अमूल्य ठरेल ग्रामीण भागातील सक्षमीकरण, आपत्ती व्यवस्थापन व पर्यावरण पूरक जीवनशैली आणि सामाजिक न्याय या क्षेत्रात आपले मार्गदर्शन आम्हाला महत्त्वाचे ठरेल त्यामुळे आपणास राजश्री शाहू प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या सल्लागार पदावर नियुक्ती करीत आहोत. आपल्या अमूल्य मार्गदर्शनामुळे संस्थेच्या सामाजिक उपक्रमांना अधिक बळ मिळेल आपणही नियुक्ती स्वीकृत करून संस्थेच्या कार्यात आपले योगदान द्यावे अशी विनंती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर म्हणून करीत आहे.

## वात्रटिका

### दिशा आणि भूल

सांगता येत नाही कधी
कोणती दिशा मिळेल...
पाच वर्षांनी एखादे भूत
पुन्हा मागे लागून छळेल...
खरं खोटं काय आहे ते
बघणारे बघतील...
नको ते मात्र भलतेच
चेकाळून निघतील...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची प्रलंबित तक्रारींवर सुनावणी

## सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील २१ तक्रारीवर सुनावणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारींच्या सुनावणीबाबत नियोजन भवन, सोलापूर येथे सुनावणी व आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी व आढावा बैठीत सोलापूर जिल्ह्यातील १२ व धाराशिव जिल्ह्यातील ९ तक्रारी अशा एकूण २१ तक्रारींवर सुनावणी करण्यात आली. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारीची सुनावनी बालहक्क आयोगाचे चैतन्य पुरंदरे, ॲड. जयश्री पालवे, ॲड. निलिमा चव्हाण हे सदस्य उपस्थित होते. तसेच आयोगाचे विधी सल्लागार प्रमोद बाडगी, श्रीमती माधवी भोसले शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना जैन, अवर सचिव व त्यांचे अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

सदर सुनावणी व आढावा बैठीत बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९, पोक्सो कायदा २०१२, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ तसेच बाल हक्कांविषयक अन्य तक्रारी या अनुषंगाने सुनावनी संपन्न झाली, सुनावणीस शिक्षण विभाग, पोलिस विभाग, बांधकाम विभाग, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बालकल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अशासकीय संस्था, जिल्हास्तरीय चाईल्ड हेल्प लाईन, रेल्वे हेल्प डेस्क व अन्य विभाग प्राशासकीय विभागाचे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रमेश काटकर यांनी केले.

# नियमबाह्य भाडे आकारणाऱ्या रिक्षा/ टॅक्सी चालकांच्या तक्रारीसाठी लवकर व्हाट्सअप क्रमांक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** प्रवाशांना नियमबाह्य भाडे आकारणे, भाडे नाकारणे तसेच गैरवर्तन करणाऱ्या रिक्षा - टॅक्सी तसेच ओला -उबर चालकांच्या तक्रारीसाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकच व्हाट्सअप क्रमांक प्रदर्शित करण्यात येणार आहे. प्रवाशांनी आपल्या गैरसोय बाबत या क्रमांकावर प्रवाशांनी तक्रार नोंदवावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. ते वांद्रे पूर्व मतदारसंघातील बांद्रा, खार व इतर रेल्वे स्थानक परिसरात रिक्षा व टॅक्सी चालकांच्या अरेरावी संदर्भात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. यावेळी आमदार वरुण सरदेसाई व मोटार परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वांद्रे पूर्वचे आमदार वरुण सरदेसाई यांनी बांद्रा, खार अंधेरी या रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांना रिक्षा व टॅक्सी चालकांची अरेरावी सहन करावी लागते. हे चालक नियमबाह्य पद्धतीने भाडे आकारतात, गैरवर्तन करतात, तसेच अनेक प्रवाशांना इच्छित स्थळी सोडण्यास नकार देतात. या संदर्भात परिवहन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली. या वेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभाग व वाहतूक पोलीस यांनी मिळून एक संयुक्त पथक नेमावे ज्या भागात अशाप्रकारे प्रवाशांना रिक्षा चालकाकडून त्रास होतो तेथे वारंवार ग्रस्त घालावी. तसेच प्रादेशिक विभाग निहाय हेल्पलाईन क्रमांक प्रदर्शित न करता पूर्ण मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकच व्हाट्सअप क्रमांक प्रदर्शित करावा व त्याला व्यापक प्रसिद्धी द्यावी. जेणेकरून प्रवासी आपल्या तक्रारी संबंधित व्हाट्सअप क्रमांकावर करतील.

तक्रार असलेल्या रिक्षा अथवा टॅक्सी चालकाला परिवहन विभागाने नोटीस पाठवणे आवश्यक असून तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन गरज पडल्यास त्याचा परवाना देखील रद्द करण्याची कारवाई करावी, असे निर्देश परिवहन विभागाला मंत्री सरनाईक यांनी दिले.

# उन्हाळ्यात रक्तदात्यांनी रक्तदानाच्या सर्वश्रेष्ठ कार्यात सहभागी व्हावे- आबिटकर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** रक्तदानाच्या चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. उन्हाळ्याच्या कालावधीमध्ये रक्तपेढीमध्ये रक्ताचा साठा कमी प्रमाणात असतो.त्यामुळे गरजू रुग्णांना उन्हाळ्याच्या कालावधीत देखील रक्त पुरवठा सुरळीतपणे उपलब्ध होण्यासाठी रक्तदात्यांनी उन्हाळ्यात देखील रक्तदानाच्या सर्वश्रेष्ठ कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात राज्य रक्त संक्रमण परिषद संचलित जे. जे. महानगर रक्तकेंद्र यांच्यावतीने स्वैच्छिक रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला दिलेल्या भेटी दरम्यान सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी आवाहन केले. यावेळी आरोग्य सेवा संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहायक संचालक महेंद्र केंद्रे, भायखळा, सर जे.जे. महानगर रक्तकेंद्राचे वैद्यकीय संचालक डॉ. हितेश पगारे यांच्यासह संबंधित डॉक्टर्स व रक्तदाते उपस्थित होते.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये महाविद्यालयांना सुट्ट्या असतात. त्यामुळे स्वैच्छिक रक्तदान शिबिरांचे प्रमाण काहीसे कमी असल्याने रक्त संकलन कमी होते, परंतु उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कॅन्सर पेशंट, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकलसेल तसेच गर्भवती महिला या सगळ्यांना रक्ताची अत्यंत आवश्यकता असते. उन्हाळ्याच्या कालावधीत गरजू रुग्णांची रक्ताची निकड लक्षात घेता, जास्तीत जास्त रक्तदात्यांनी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मंत्री आबिटकर यांनी केले.

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from **Prashant Madhukarappa Bhadange** "has been changed to new name **Prashant Madhukar Bhadange** for passport issuance.

**Classified - छोटी जाहीरात**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# उद्योग व्यावसायाला विद्यार्थ्यांनी प्राधान्या द्यावे - शिवाजीराव पवार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शासकीय सेवेत नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात कमी होत आहे. त्यामुळे प्रत्येक तरुणाला शासकीय नोकरी मिळणे दुरापास्त झाले आहे. कुटुंबाचा आणि आपला आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर तरुणांनी नोकरी पेक्षा उद्योग व्यावसायाला प्राधान्या देणे आवश्यकच आहे. असे प्रतिपादन यशदाचे प्रशिक्षक शिवाजीराव पवार यांनी केले.



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 17 ते 21 मार्च 2025 या कालावधीत विद्यापीठामध्ये आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय युवा नेतृत्व शिबिराच्या दुर्सया दिवशीच्या व्याख्यानात पवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विकास पाटील उपस्थित होते होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी शिवाजीराव पवार म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्रात छोटा उद्योग सुरु केला पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्येकाला वेगवेळे प्रश्न भेडसावत असतात. त्यामुळे आजच्या तरुण पिढिसमोर अनेक प्रश्न आहेत. तसा नोकरीचा देखिल प्रश्न आहे. त्यामुळे नोकरीच्या मागे न लागता वेळेचे भान लक्षात घेवून आणि वास्तवाची जाणीन ठेवून उद्योग व्यावसाय सुरु करणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणोनी सेवा क्षेत्र, उत्पादन क्षेत्र आणि प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्यावे असेही शिवाजीराव पवार यांनी स्पष्ट केले.


दुर्सया दिवशीच्या पहिल्या सत्रात युवकांचे नेतृत्व आणि पर्यावरण विकास या विषयावर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वय डॉ. विरभद्र दंडे यांनी मांडणी केली. यावेळी अध्यक्षस्थानी मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठात डॉ. वसंत कोरे उपस्थित होते. तिर्सया सत्रात उमाकांत चनसेट्टी यांनी युवक कार्याच्या संकल्पना या विषयावर मांडणी केली. कौशल्य विकास आणि रोजगार या विषयावर कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मांडणी केली. यावेळी डॉ. कोळेकर म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य विकशीत करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे कौशल्य आहे असेच विद्यार्थी स्पर्धेच्या युगात टिकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त कौशल्य विकशित करावी. असे डॉ. कोळेकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विठ्ठल एडके यांनी केले तर आभार महादेव व्हनकळस यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस विभागाच्या कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत केली.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १२ मार्च, २०२५ रोजी पुरस्कार समितीची बैठक झाली. या बैठकीत झालेल्या चचेर्नुसार पुरस्कारासाठी शिल्पकार राम सुतार यांची २०२४



च्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. पंचवीस लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# परवानगीच्या हद्दीबाहेर वाळू उपसा केल्यास दंडात्मक कारवाई

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये वाळू उपशाच्या ठिकाणी पाहणी मोहीम राबविण्यात येईल. परवानगीपेक्षा जास्त प्रमाणात किंवा ठरवलेल्या हद्दीबाहेर वाळू उपसा केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य प्रशांत ठाकूर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य जयंत पाटील, अमित देशमुख, रणधीर सावरकर, प्रशांत बंब, अस्लम शेख, विश्वजीत कदम, आशिष देशमुख, हेमंत ओगले यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.



मंत्री बावनकुळे म्हणाले, लवकरच नवीन वाळू धोरण आणले जाणार असून हे वाळू धोरण विविध राज्यातील वाळू धोरणांचा अभ्यास करून तयार करण्यात आले आहे. प्रतिक्रियांसाठी हे धोरण सार्वजनिक करण्यात आल्यानंतर त्यावर २८५ पेक्षा जास्त सूचना आल्या आहेत. राज्यामध्ये मागणीवर आधारित वाळूचा पुरवठा करण्यात येणार आहे. पुढच्या दोन वर्षामध्ये नदीतून नाही तर दगड खाणीवरून एम सॅण्ड तयार करण्यात येईल. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टोन क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्या माध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षात वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. मंत्री बावनकुळे म्हणाले, घरकुल बांधणाऱ्यांसाठी आता मोफत वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोकणात सेक्शन पंपाद्वारे प्रचंड प्रमाणात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन होणाऱ्या सर्व सक्शन पंपावर कारवाई करण्याचे आदेश कोकण आयुक्तांना दिले आहेत. यानंतरही वाळू उत्खनन सुरू राहिल्याचे निदर्शनास आले तर संबंधित तहसीलदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाबाबत लवकरच बैठक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात ३५८ तालुक्यांमध्ये १०० तालुका क्रीडा अधिकारी पदे मंजूर असून इतर तालुक्यांमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे कार्यभार आहे. पद निर्मितीचा आणि आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाच्या पातळीवर विचाराधीन असून लवकरच तो प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर अधिकारी उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाबाबत सर्व संबंधित सदस्यांसमवेत लवकरच बैठक आयोजित करून चर्चा करण्यात येईल, असे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अमोल मिटकरी यांनी तेल्हारा (जिल्हा अकोला) येथील तालुका क्रीडा संकुलाची दुरावस्था झाल्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सदाशिव खोत, शिवाजीराव गर्जे, विक्रम काळे, कृपाल तुमाने, उमा खापरे आदींनी सहभाग घेतला.

मंत्री भरणे म्हणाले, तालुका क्रीडा संकुल येथे सुविधा अपुऱ्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि लवकरच तीन कोटी रुपयांच्या प्रस्तावित कामांमध्ये संरक्षण भिंत, इनडोअर हॉल, विद्युतीकरण, ड्रेनेज व्यवस्था, रेन वॉटर हार्वेस्टिंग, क्रीडा साहित्य आदी सुविधा निर्मितीचे अंदाजपत्रक तयार केले जाईल तसेच राज्य क्रीडा विकास समितीसमोर मान्यतेसाठी ठेवून हा प्रश्न तातडीने मार्गी लावला जाईल. सभापती प्रा. राम शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार ज्या ठिकाणी क्रीडा मंडळे चांगले काम करीत असतील तेथे क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीचे काम त्यांना देण्याबाबत बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री श्री. भरणे यांनी सांगितले. शासकीय इमारतींच्या बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीच्या कामासंबंधीचा दर हा २०१४ सालचा आहे. हा दर बदलण्याची शिफारस करण्यात आली असून लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# पीएम किसानसाठी फार्मर आयडी असणे बंधनकारक

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):** प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेचे अनुदान घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक केले आहेत. जिल्ह्यातील पाच लाख ६८ हजार शेतकऱ्यांपैकी तीन लाख ८९ हजार शेतकऱ्यांनी फार्मर आयडीचे काढून घेतले आहेत.

राज्य शासनाने राज्यात ॲग्रीस्टॅक योजना आणली आहे. यात सातबारा उतारा हे आधारकार्ड आणि बँक खात्यांशी लिंक केले जात आहेत. यापुढील काळात नुकसान भरपाई, पिक विमा, नमो सन्मान योजना, पीएम किसान सन्मान निधी, पीक कर्ज वाटपासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडून फार्मर आयडी काढून घेण्यासाठी शिबीरे घेतली जात आहेत.

आधार कार्डावरील माहितीच्या आधारे हे ओळखपत्र देण्यात येत आहे. आधारमधील ८० टक्के माहिती जुळली तरी ओळख क्रमांक देण्यात येत आहेत. त्यापेक्षा कमी माहिती जुळत असली तरी पडताळणी करून अशा अर्जावरही तलाठ्यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश भूमी अभिलेख विभागाने दिले आहेत. मात्र, असा अर्ज स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार तलाठ्यांनाच असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने पीएम किसान या योजनेचा २० वा हप्ता नुकताच शेतकऱ्यांना थेट निधी हस्तांरणाद्वारे जमा केला आहे. परंतू २१ व्या हप्त्यासाठी ॲग्रीस्टॅक योजनेत नोंदणी आवश्यक केली आहे.

### आधार आणि सातबारावरील नावात फरक

पूर्वीच्या काळात शेतखरेदी आणि वारसा नोंदीत नावे लावताना योग्य ती खबरदारी घेतली नाही. सातबारा उताऱ्यावर एक नाव आणि त्याच नावात थोडासा बदल असलेला आधार कार्डवर दुसरे नाव आहे. त्यामुळे फार्मर आयडी मिळविताना शेतकऱ्यांना पुन्हा सातबारा उताऱ्यावरील नावासारखे आधार कार्डवर नाव दुरुस्त करुन घ्यावे लागत आहे. दुसरीकडे आधारला मोबाईल नंबरही अपडेट करुन घ्यावा लागत आहे.

# अखेर प्रशासक पांढरे यांनी दूध संघाचा पदभार घेतला

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा दूध संघाचे प्रशासक श्रीनिवास पांढरे यांनी तब्बल १७ दिवसांनंतर मंगळवारी प्रशासकपदाचा पदभार घेतला. जिल्हा सहकारी दूध संघाच्या गलथान कारभारामुळे ५ मार्च रोजी पुणे येथील उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी संचालक मंडळ बरखास्त करून संघाचा कारभार विशेष लेखा परीक्षक श्रीनिवास पांढरे व इतर दोन सदस्यांच्या प्रशासकीय मंडळाकडे देण्याचा आदेश काढला. मात्र, दूध संघाचे प्रभारी कार्यकारी संचालक उत्कर्ष चौरे यांनी पांढरे यांना पदभार घेऊ नये, असे पत्र दिल्याने प्रशासक मंडळाने पदभार घेतला नव्हता. या सर्व घडामोडींमुळे मात्र दूध संघाचा कारभार ठप्प झाला होता. त्यामुळे प्रशासक मंडळ केव्हा पदभार घेणार याकडे दूध उत्पादकांचे लक्ष लागले होते. वास्तविक पाहता पुणे येथील उपनिबंधकांच्या आदेशानंतर प्रशासक श्रीनिवास पांढरे यांनी तत्काळ पदभार घेणे गरजेचे होते. मात्र, त्यांनी पदभार घेतला नाही. दरम्यान, संघाचे प्रभारी कार्यकारी संचालक चौरे यांनी पांढरे यांना पाठवलेल्या पत्रामध्ये संचालक मंडळाने बरखास्तीच्या निर्णयाबाबत मुंबई येथील निबंधकांकडे अपील दाखल केले असून त्यांच्या निर्णयानंतर पदभार घ्यावा, असे म्हटले होते. दरम्यान, सोमवारी मुंबई येथील सहनिबंधक संस्था यांच्यासमोर सुनावणी होणार होती. मात्र, यावर सुनावणी न होता ती आता ७ एप्रिलला होणार आहे. या तारखेची वाट न पाहता मंगळवारी पांढरे यांनी पदभार घेऊन याची माहिती पुणे येथील उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई येथील विशेष कार्य अधिकारी लेखापरीक्षा मंडळ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक आणि जिल्हा दूध संघाच्या तत्कालीन संचालक मंडळाला पत्राद्वारे कळविली आहे.

रे. मु.नं. १०६/२०२०
निशाण नं. १७

**जाहीर समन्स**

**माढा येथील मे.सि.ज.ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**

हनुमंत सुखदेव दास } वादी
**विरूध्द**
दादा उध्दव दास वगैरे } प्र. वादी


ज्याअर्थी यातील खालील प्रतिवादी हे दावेत दिलेल्या पत्त्यावर राहत नाही असा बेलिफ रिपोर्ट नि.१५ प्रमाणे आर.पी.ए.डी. ने समन्स न बजावता परत आलेनंतर वादी तर्फे दिलेले निशाण नंबर १६ वरील आदेशाप्रमाणे जाहीर समन्स बजावणेचा आदेश झालेवरुन प्रतिवादी नंबर ७ यांना या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की,प्रतिवादी नंबर ७ धनंजय किसन दास, रा. रोपळे क, ता.माढा, जि. सोलापूर या प्रतिवादीस या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वादीनी आपले विरुध्द दावा मोजणी होवुन हददीखना कायमह होवुन मिळणेसाठी वरील दावा केलेला आहे.

त्यास आपले म्हणणे/कैफियत दाखल करणेसाठी पुढील नेमलेली तारीख ०३/०५/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वत:अगर वकीलांमार्फत हजर व्हावे, तसेच आपला राहता पत्ता, मोबाईल नंबर सादर करावा. वरील तारखेस आपण गैरहजर राहिलेस आपले काही म्हणणे नाही असे समजून पुढील योग्य ते आदेश केले जातील.हे जाहीर समन्स आज रोजी दि.१९/०३/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले.

**(श्री.पी.एस.जगताप)**
**क.लि.**

**आदेशावरुन,**
**(श्री.एस.एम.वलेकर)सहा.अधीक्षक,**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, माढा.**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :**
१) फॅशन चित्रपटाची नायिका
२) पानाच्या विड्यात हा वापरतात
३) आंब्याचा रस ४) सूर्य, तपन
५) वैमानिक ६) स्वस्तच्या विरुध्द
८) जुनाच्या विरुध्दार्थी १०) दरारा
१३) धागा गुंडाळण्याची डबी
१५) लिहिण्यासाठी हा वापरतात
१८) राष्ट्रवादीचे सुप्रिमो
२०) बॉडीगार्ड (मराठीत)
२१) फीत २२) हनुमानाचा वार
२३) विना **** नाही उध्दार
२४) माशाचा एक प्रकार
२५) चढ शब्दाच्या विरुध्दार्थी
२७) ** करी काम -एक म्हण
३३) एक पौष्टीक सुका मेवा
३४) अनुष्काचा एक चित्रपट - ** ने बना दी जोडी
३५) श्वास घेताना त्रास होणारा आजार
३७) शहर ३
८) एक माजी मंत्री - विमल ***
३९) देव ४०) गर्दन, सन्मान
४१) दु:ख (हिंदीत)
४४) कासव आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे.

**आडवे शब्द :** १) राहुल गांधी यांच्या भगिनी
३) ठाकरे गटाचे युवासेना प्रमुख (फक्त नाव)
५) अजित पवार यांच्या मुलाचे नाव, अर्जुन
७) ध्येय प्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण करणे - ** ** धन
९) दुधावरील मलई १०) पाच दुणे ११) लहान मोटारगाडी
१२) नियमित वारी करणारे १४) घाई, गडबड
१६) वाकडा शब्दाच्या विरूध्दार्थी १७) पिण्याची क्रिया
१९) एक महिना २०) हत्तीवर बसण्यासाठी बनवलेला हौदा
२३) तीन दुणे २४) अति ** अन् भीक माग - एक म्हण
२५) चरितार्थ, उपजीविका २६) देवाचा आशिर्वाद २८) फ्ल्यू (मराठीत)
२९) छ. शिवरायांची लढण्याची पध्दत - गनिमी **
३०) समर्थ व खंबीर असणे, पात्र असणे ३१) शिरा याच्यापासून बनवितात
३२) ताणला जाणारा घटक ३६) पळणे (इंग्रजीत)
३८) महाराष्ट्राची राजधानी ४०) आईचा भाऊ ४२) उष्ण, तप्त
४३) श्वास घेण्याची क्रिया ४५) आई (इंग्रजीत)
४६) ** घर पोकळ वासा - एक म्हण ४७) पातळ कालवण, पृथ्वी

## सुडोकु - 205

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | | 7 | 2 | |
| | | 3 | 2 | 7 | 8 | | 9 | |
| | 5 | 7 | | | | 3 | | 8 |
| | | | 9 | 6 | | | 7 | 1 |
| | | | | 8 | 2 | | 6 | 3 |
| 1 | 9 | 6 | | | | | 4 | 2 |
| 3 | | 8 | | 2 | 9 | | | 4 |
| | | 9 | | 5 | 1 | | | |
| | 6 | | 7 | | 3 | | 8 | 9 |

# मराठा सेवा संघाची 'जिजाऊ रथ यात्रा' नियोजन बैठक उत्साहात




**मोहोळ ( कटुसत्य वृत्त ):–** मराठा सेवा संघ मोहोळ तालुका आयोजित जिजाऊ रथयात्रा नियोजनाची बैठक सेवा संघाच्या कार्यालयात विविध विषयावर चर्चा होऊन पार पडली. 'अनिस' चे राज्य सदस्य डॉ. गोविंद पाटील, मराठा सेवा संघ जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू थिटे, सदस्य तानाजी चटके, डॉ प्रमोद पाटील, ॲड. श्रीरंग लाळे, पत्रकार रमेश दास, कल्याण गव्हाणे, वैभव गुंड, मनोज मोरे, दिपक पारडे यांच्या प्रमुख उपस्थिती होती. २५ मार्च रोजी मोहोळ तालुक्यात जिजाऊ रथ यात्रा येणार आहे त्याच्या नियोजनासाठी समन्वय समिती चर्चेद्वारे तयार केली जाणार असून, यात सर्व जाती धमार्तील मराठा सेवा संघ कार्यकर्त्यांना समन्वयक म्हणून नेमण्यात येणार आहे. तालुक्याच्या वतीने २५ मार्च रोजी अनगर येथे सकाळी ११ वाजता स्वागत आणि नंतर बारा वाजता रथयात्रा मोहोळ शहरात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवरायांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून पारंपरिक वाद्यांच्या गजरात बुद्ध विहारपर्यंत फेरी होईल तेथे चैत्यभूमीला अभिवादन करून बुद्ध मूर्तीस पुष्प अर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर कन्या प्रशाला मार्गे लोकसेवा हॉटेल कॉन्फरन्स हॉल मध्ये सभा आणि भोजनानंतर कार्यक्रमाची समाप्ती होणार आहे. तसेच शहरात महापुरुषांच्या विचारांचे डिजिटल लावण्यात येणार आहेत. वेगवेगळया जातीं धर्माच्या समूहाने रथ यात्रेचे स्वागत करीत समता, बंधुता आणि प्रेमभाव जपत सहभाग होणार आहेत. यावेळी तुकाराम बीज निमित्त प्रतिमा पूजन करुन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सावळेश्वरच्या नूतन सरपंच पदी निवड झालेले सखाराम साठे सर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. नव्याने सुरू होणाऱ्या शाहीर विश्वासराव फाटे वैचारिक वाचनालयासाठी उपलब्ध पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. प्रास्ताविक तालुकाध्यक्ष मनोज मोरे यांनी, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष दीपक पारडे यांनी तर सचिव आकाश फाटे यांनी आभार मानले.

शाहीर खाडे यांचादमदार पोवाडा सोलापूर येथील शाहीर रमेश खाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा पोवाडा आपल्या पहाडी आवाजात गायन करून उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. मराठा सेवा संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

## हिंदू-मुस्लिम ऐक्याचा दिला संदेश



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** तालुक्यातील जेऊर येथे संभाजी ब्रिगेड आयोजित रमजान पवित्र महिन्याच्या निमित्ताने अलिफ मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके म्हणाले की, संभाजी ब्रिगेड हि संघटना सर्व जाती धमार्तील बांधवांना एकत्रित घेऊन चालणारी एकमेव संघटना आहे. जाती-जातीत तेढ निर्माण न करता सर्व जातीतील बांधवांना एकत्रित घेऊन काम करणारी व महापुरुषांच्या विचारधारेवर सर्व समाज बांधवांचं संघटन करणारी संघटना आहे. काही समाजकंटक जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करीत आहेत. व स्वतःच्या राजकीय स्वाथापीटी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी समाजकंटकांचा वापर करीत आहे. तरी समाज बांधवांनी अशा चिथावणी खोर लोकांपासून सावध राहावे. हा द्वेष रोखण्याचं काम व जातीय सलोखा राखण्याचे काम गेली कित्येक वषार्पासून मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड ही संघटना काम करत आहे.

यावेळी या कार्यक्रमास संभाजी ब्रिगेड पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके, बाळासाहेब झोळ, निलेश पाटील, ता.अध्यक्ष सुहास पोळ, शहअध्यक्ष अतुल निर्मळ, पिंटू जाधव, आदिनाथ माने, धनंजय गारुडी, सचिन कसबे, सागर कोठावळे, सागर साखरे, अजित उपाध्ये, अविनाश घाडगे, विठ्ठल जाधव, बनकर, नाना साहेब पोळ, अशितोष कसबे आदि कार्यकर्ते व बहुसंख्येने सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# राज्य स्पर्धेसाठी जिल्ह्याचे पुरुष, महिला किशोरी हे तीन संघ पात्र



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्हा किशोर व महिला खो-खो संघाच्या सराव शिबिरास जुळे सोलापूर येथील वसुंधरा महाविद्यालयाच्या मैदानावर तर पुरुष संघाच्या सराव शिबिरास ह. दे. प्रशालेच्या मैदानावर सुरवात झाली. या सराव शिबिरात निवडलेले अंतिम संघ इचलकरंजी (कोल्हापूर) येथे 23 ते 27 मार्च दरम्यान होणाऱ्या राज्य शासनाच्या भाई नेरूरकर खो-खो स्पर्धेत भाग घेणार आहेत. जिल्ह्याचे पुरुष व महिला आणि किशोरी हे तीन संघ या स्पर्धेसाठी पात्र झाले.

या सराव शिबिराचे उद्घाटन स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या हस्ते झाले. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन सचिव ए. बी. संगवे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, खजिनदार श्रीरंग बनसोडे, निवड समिती सदस्य प्रथमेश हिरापुरे, अतुल जाधव, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, सदस्य अजित शिंदे, शेखलाल शेख, पुंडलिक कलखांबकर, राजशेखर जोडमोटे, आनंद जगताप, यशोदीप आठवले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीकृष्ण कोळी यांनी केले.

# रमजान सणानिमित्त आजपासून मीना बाजार होणार सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** रमजान सणानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे सोलापुरातील विजापूर येथे मीना बाजार शुक्रवार दि. 21 मार्च 2025 पासून भरविण्यात येणार आहे. यामध्ये सुमारे 700 स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. नेटके नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष रियाज(राजू) कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या 70 ते 75 वषार्पासून सोलापूर शहरातील विजापूर वेस परिसरात हा मीना बाजार भरविण्यात येतो. मीना बाजार व्यापारी संघाच्या वतीने याचे आयोजन केले जाते. रमजान सणानिमित्ताने अनेक हिंदू – मुस्लिम बांधव या परिसरात दुकाने थाटतात. शीरखुमार्चा सुकामेवा, कपडे, महिलांचे सौंदर्य प्रसाधने, धार्मिक ग्रंथ, लहान मुलांचे कपडे, अत्तर यासह विविध साहित्य व पदार्थ विक्री केली जाते. सुमारे 700 स्टॉल्स यामध्ये उपलब्ध आहेत. व्यापारी आणि ग्राहक यांच्यात सुसूत्रता आणण्याचे काम मीना बाजार व्यापारी संघाच्या वतीने करण्यात येते. या परिसरात कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेचे डिजिटल लावू नये यासाठी पोलीस आणि महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले आहे. या मीना बाजारसाठी सोलापूर महापालिका, राज्य विद्युत मंडळ, पोलीस यांचे सहकार्य लाभते, असेही अध्यक्ष रियाज कुरेशी यांनी सांगितले.

### हे आहेत यंदाचे नूतन पदाधिकारी

मीना बाजार व्यापारी संघाची बैठक माजी अध्यक्ष हाजी मतीन बागवान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये नूतन पदाधिकारी निवडण्यात आले. यामध्ये अध्यक्ष – रियाज कुरेशी, उपाध्यक्ष– वसीम सालार, म.कलीम तुळजापुरे, जनरल सेक्रेटरी– अश्फाक बागवान, जॉइंट सेक्रेटरी– मुस्ताक नजम रंगरेज, खजिनदार अ.अजीज शेख, कार्याध्यक्ष – महमदसाब सौदागर, प्रमुख सल्लागार – हाजी मैनुद्दीन शेख, हाजी मुनाफ चौधरी, इसाक सय्यद, जुबेर बागवान, इम्रान सालार, सदस्य – जाकीर नाईकवाडी, सलीम हिरोली, मंजूर बागवान, हाजी तोफिक हत्तुरे, राजा सिंदगीकर, याकुब शेख आदी उपस्थित होते.

# आश्लेषा बागडे यशवंतश्री पुरस्काराने सन्मानित



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** येथील विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी आश्लेषा बागडे हिने कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरती उतुंग यश संपादन केल्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने दिला जाणारा पहिला "यशवंतश्री" पुरस्कार तिला प्रदान करण्यात आला. विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे सर यांच्या संकल्पनेतून या वर्षीपासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा यशवंतश्री पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र व ५१ हजार रुपये असे आहे. हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहांमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे सर होते. या पुरस्काराचे वितरण मा.विलासराव घुमरे सर व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.राजेंद्र दास यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय मनोगतातून मा. विलासराव घुमरे सर यांनी आश्लेषा बागडे हिने महाविद्यालयाचे नाव देशपातळीवर केलेले आहे. अशी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल तिचे कौतुक केले. त्याचबरोबर येथून पुढे महाविद्यालयातील जे विद्यार्थी अशी उत्कृष्ट कामगिरी करतील अशा सर्व होतकरू विद्यार्थ्यांच्या पाठीमागे संस्था अगदी भक्कमपणे उभी राहील असे सांगितले. यावेळी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. तात्यासाहेब मस्कर, संस्थेचे विश्वस्त श्री.चंद्रशेखर शीलवंत, माजी शिक्षण विस्तार अधिकारी श्री. अनिल बदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी.पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य श्री. संभाजी किर्दाक, आश्लेषाचे आई-वडील, आप्तेष्ट, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान प्रमुख प्रा.विष्णु शिंदे यांनी केले तर आभार प्रा.एम. डी.जाधव यांनी मानले.

# शिक्षक भारती संघटनेच्या माळशिरस तालुका अध्यक्षपदी प्रा.शिवाजी बर्गे यांची निवड


**प्रा.शिवाजी बर्गे यांना अध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र देताना जिल्हाध्यक्ष्य प्रा.शाहू बाबर**

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** उच्च माध्यमिक ज्यूनिअर कॉलेज शिक्षक भारती संघटनेच्या माळशिरस तालुका अध्यक्षपदी प्राध्यापक शिवाजी बर्गे यांची निवड करण्यात आली.उच्च माध्यमिक ज्यूनिअर कॉलेज शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.शाहू बाबर यांच्या हस्ते प्राध्यापक शिवाजी बर्गे यांचा सन्मान करून त्यांना माळशिरस तालुका अध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले.यावेळी बोलताना तालुक्याचे नूतन अध्यक्ष प्राध्यापक शिवाजी बर्गे म्हणाले की, शिक्षक भारती संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी माझ्यावर देऊन शिक्षक भारती परिवाराने माझ्यावर टाकलेला विश्वास पूर्णपणे सार्थ ठरवण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करून शिक्षकांचे प्रश्न, अडी – अडचणी सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहुल संघटना वाढीसाठी प्रयत्न करेन असे मत प्राध्यापक शिवाजी बर्गे यांनी निवडी प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष्य प्रा.शाहू बाबर प्रा.महेश डोके, प्रा. महेंद्र बडीगेर उपस्थित होते.प्रा. शिवाजी बर्गे यांची उच्च माध्यमिक ज्यूनिअर कॉलेज शिक्षक भारती संघटनेच्या माळशिरस तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून सन्मान होत असून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# स्त्री शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने वसतिगृहातील मुलांसोबत रंगपंचमी साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष किरण माशाळकर यांनी सोलापूरात वसतिगृहातील मुलांसोबत रंगपंचमी साजरी करण्याची संकल्पना आणली.दर वर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा श्री हिंगलाजमाता मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह ,सोलापूर येथे मुलांसोबत रंगपंचमी साजरी करण्यात आली.

सदर वसतिगृहातील मुले सोलापूर जिल्हा व इतर जिल्ह्यातील आहेत. हे मुलं आपल्या कुटुंबा समवेत सण साजरा करत नाहीत .त्या मुळे दर वर्षी स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन च्या वतीने रंगपंचमी हा सण मोठ्या उत्साहात वसतिगृहात साजरा केला जातो.तेथील मुले खूप आनंदी होते. वसतिगृहातील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्षा कु. किरण माशाळकर, लता ढेरे व संस्थे चे सर्व पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# अग्निवीर निवड चाचणीसाठी 10 एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्यातील अधिवास असणाऱ्या अविवाहीत पुरुष उमेदवारांनी अग्निपथ योजनेअंतर्गत २०२५-२६ या वषार्साठी अग्निवीर प्रवेशासाठी निवड चाचणीसाठी १० एप्रिल २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे. प्रवेशासाठी https://www. joinindianarmy.nic.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करण्याची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. भरतीची प्रवेश परीक्षा जून २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील पात्र व इच्छूक नवयुवकांनी सदर संधीचा फायदा घ्यावा असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी असे आवाहनही केले आहे.

# अनुसुचित जाती जमाती सदस्य गोरक्ष लोखंडे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** अनुसुचित जाती जमाती सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे दिनांक 24 मार्च 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.

सोमवार दि.24 मार्च 2025 रोजी सकाळी 10.00 वा. सोलापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन. सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी 12 ते 01 मुख्याधिकारी नगरपंचायत माळशिरस यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी 01.00 ते 02.00 मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी 02.00 ते 03.00 मुख्याधिकारी नगरपरिषद मैंदर्गी यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी 03.00 ते 04.00 मुख्याधिकारी नगरपरिषद अकलूज यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी 04.00 ते 05.00 मुख्याधिकारी नगरपंचायत माढा यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी 05.00 ते 06.00 मुख्याधिकारी नगरपंचाय बार्शी यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी 06.00 ते 07.00 पर्यंत मुख्याधिकारी नगरपंचायत करमाळा यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. व नंतर शायकीय विश्रामगृह सोलापूर येथे मुक्काम. मंगळवार दि.25 मार्च 2025 रोजी सकाळी 08.00 वाजता मोटारीने सोलापूर येथून लातूर कडे रवाना होतील.

# गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर कारवाई करणार – फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** कायद्यानुसार गो हत्या करणे गुन्हा आहे. मात्र गो हत्तेचा वारंवार गुन्हा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वारंवार अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार यापुढे कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.

श्रीगोंदा येथील कायदा सुव्यवस्थेच्या बाबत सदस्य संग्राम जगताप यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे २ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन समाजामध्ये वाद झाला. या वादाचे नंतर मारहाणीत रूपांतर झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तसेच मारहाणीत जखमींना पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. दुर्दैवाने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केलेल्या एका इसमाचा यात मृत्यू झाला. पोलिसांनी यामध्ये कुठल्याही प्रकारची दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हेगाराला अटकही केली. मात्र न्यायालयातून जामिनावर त्याची सुटका झाली. श्रीगोंदा शहरातील प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्यात येऊन कोणालाही सोडण्यात येणार नाही, असेही गृह राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले.

# आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सामाजिक समता व समरसता निर्माण करण्याचे दृष्टीने आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह झालेल्या दांपत्याना 50 हजार रुपये प्रति जोडपे अनुदान वितरीत करण्यात येते. सदर अनुदान विवाहित जोडप्यांचे संयुक्त बँक खात्यावर (पीएफएमएस) ढक्र्र्र प्रणालीमार्फत डीबीटी द्वारे प्रदान करण्यात येते. सन 2024-25 या वर्षी शासनाकडून 1 कोटी 61 लाख निधीची तरतूद प्राप्त झालेली आहे. सन 2022-23, सन 2023-24 व सन 2024-25 मधील 276 पात्र लाभार्थ्यांना 1 कोटी 38 लाख इतके अनुदान मंजूर करण्यात आले असून, लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर (पीएफएमएस) PFMS प्रणालीमार्फत डीबीटी द्वारे प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हयातील नागरीकांनी तात्काळ जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे अर्ज सादर करावेत असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# बेरोजगारांसाठी प्रधानमंत्री इंटर्नशीप योजना : इच्छूकांनी 31 मार्चपर्यंत अर्ज करावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** प्रधानमंत्री इंटर्नशीप योजनेद्वारे सुशिक्षित बेरोजगारांना इंटर्नशीपची संधी दिली जाणार आहे. ही योजना" ही सुशिक्षित बेरोजगारांना कौशल्य वृध्दीसाठी व रोजगाराच्या संधीसाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी दि. ३१ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

या योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी वेबसाईटवर प्रोफाईल तयार करून विविध क्षेत्रातील इंटर्नशिपसाठी अर्ज करावा, उमेदवार अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत तीन इंटर्नशिपसाठी अर्ज करु शकतात, या अंतर्गत युवकांना 12 महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळेल या सोबतच त्यांना दरमहा 5000 रुपये ही मिळतील या शिवाय इंटर्नशिप पुर्ण झाल्यानंतर 6000 रुपये एकरकमी अनुदान दिले जाईल.

भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण प्रदान केले जाते. उमेदवारांना इंटर्नशिप संधीसाठी http://pminternship.mca. gov.in/ पोर्टलवर नोंदणी करावी. संधींबाबतची माहिती अधिकाधिक उमेदवारांपर्यंत पोहोचवावी व संबंधित रोजगार संधींच्या अनुषंगाने अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे दुरध्वनी क्र.0217-2992956 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन ही कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

# मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा स्मारकाच्या जागा उपलब्धतेसाठी समिती गठित करणार– मंत्री गोरे

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** मंगळवेढा (जि. सोलापूर) ही संतांची भूमी आहे. या भूमीत जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा यांच्या नियोजित स्मारकासाठी जागा निश्चितीनंतर स्मारक उभारणीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच स्मारक उभारणी हा केंद्रबिंदू म्हणून स्मारकाच्या जागा निश्चितीसाठी नव्याने समिती गठित केली जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरावेळी सांगितले.

महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा यांच्या स्मारकाबाबत सदस्य समाधान आवताडे यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य अभिजीत पाटील व विजय देशमुख यांनीही सहभाग घेतला.

मंत्री गोरे यांनी सांगितले, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी यापूर्वी तत्कालीन पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती मात्र सध्या ही समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे नव्याने समिती गठीत केली जाईल.

महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी कृषी विभागाची जागा प्रस्तावित होती, मात्र ती नाकारल्यानंतर कृषि तलावाच्या बाजूची जागा स्मारकासाठी विचाराधीन आहे. ही जागा देण्याच्या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

मंत्री गोरे यांनी सांगितले, मंगळवेढा येथे संत चोखामेळा यांच्या स्मारकासाठी ही जागा निश्चित उपलब्ध करून देण्याबाबत मंगळवेढा नगरपरिषदेला सूचित केले जाईल. मंगळवेढा येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आणि संत चोखामेळा स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.